# हैं तय्यार हम...

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE 21km
17 Dec 2017
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon




**मॅरेथॉनचा उत्साह...** औरंगाबाद महामॅरेथॉनचे टायटल स्पॉन्सरर असलेल्या सॅफ्रन ग्रुपचे सदस्य योगेश वरगंटवार, भरत जैन, राजेश वरगंटवार, मुरली नलाप्पा, अनिल मुनोत, अभिनेत्री तेजस्विनी पंडित, महेश लाभशेटवार, मनोज काला, ललित झांबड. ग्रुपच्या वतीने मॅरेथॉनच्या टायटलचे तेजस्विनी पंडित हिच्या हस्ते फुगे सोडून विमोचन करण्यात आले.

ग्रुप बुकिंगसाठी त्वरा करा

महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग लवकरात लवकर निश्चित करावा. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत करता येईल. या स्पर्धेत शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी ९९२१०३०७००, ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनही करता येईल. त्यासाठी धावपटूंनी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.

स्पर्धा
Half Marathon - 21 Kms
Power Run - 10 Kms
Fun Run - 5 Kms
Family Run - 3 Kms

## सांभाळकर यांची संचालकपदी निवड

लोकमत न्यूज नेटवर्क



**औरंगाबाद :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्राच्या संचालकपदी डॉ. संजय सांभाळकर यांची नियुक्ती केली आहे. डॉ. सांभाळकर हे दगडोजीराव देशमुख महाविद्यालयात उपप्राचार्य आणि राज्यशास्त्र विभागप्रमुखपदावर कार्यरत आहेत. डॉ. सांभाळकर हे राष्ट्रीय सेवायोजना विभागाचे औरंगाबाद जिल्हा समन्वयक म्हणूनही कार्यरत आहेत.



**जलपर्णी...** सलीम अली तलावातील जलपर्णी वाढू लागली असून, उन्हाळ्यापर्यंत जलपर्णीने पूर्ण तलाव व्यापून जाण्याची चिन्हे आहेत. यासाठी आधीच उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

# सदस्यांचे प्रस्ताव मंजूर न केल्याने अविश्वास

## एम.एम. शेख : वक्फ बोर्डाच्या सदस्यांवर पलटवार; हंगामी अध्यक्ष म्हणून काम करणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : वक्फ** बोर्डातील काही सदस्यांनी जमिनी हडपण्यासाठी आपल्याकडे प्रस्ताव आणले होते. हे प्रस्ताव मान्य न केल्याने त्यांनी एकत्र येऊन आपल्या विरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल केल्याचा आरोप वक्फ बोर्डाचे प्रभारी अध्यक्ष एम.एम. शेख यांनी बुधवारी एका पत्रकार परिषदेत केला.

मागील आठवड्यात वक्फ बोर्डाचे सदस्य हबीब फकी, आ. बाबा जानी आणि शेख जमील यांनी एका पत्रकार परिषदेत वक्फचे तत्कालीन अध्यक्ष एम.एम. शेख यांच्यावर विविध आरोप केले होते. या आरोपानंतर बुधवारी शेख यांनीही एका पत्रकार परिषदेत बोर्डातील विरोधकांवर जोरदार पलटवार केला. माझ्यावर अविश्वास ठराव आणला. त्यापूर्वीच मी अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन टाकला. शासनाने नवीन अध्यक्ष निवडण्यापर्यंत मलाच हंगामी अध्यक्ष म्हणून कामकाज पाहण्याचे आदेश दिले आहेत. वक्फची जमीन आपण कोणालाही सहजासहजी हडप करु देणार नाही.

हबीब फकी यांच्यावर बॉम्बगोळा टाकत शेख यांनी नमूद केले की, मुंबईच्या माहिम भागात दर्गाहच्या ट्रस्टमध्ये मुतवल्ली म्हणून स्वत:चे नाव टाकून घेतले. हा वाद सध्या सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. औरंगाबाद शहरातील नक्षत्रवाडी भागातील २५ एकर जमीन त्यांचा कार्यकर्ता सलीम पटेल वाहेगावकर याला देण्यासाठी माझ्यावर बराच दबाव टाकला. याबाबतचा प्रस्तावही बोर्डाच्या बैठकीत आणला होता. हा प्रस्ताव मी फेटाळून लावला आहे.

बोर्डाचे आणखी एक सदस्य मौलाना वस्तानवी यांनी अहमदनगर येथे एक महाविद्यालय सुरु करण्यासाठी वक्फची ६ एकर जागा देण्याचा प्रस्ताव ठेवला होता. या प्रस्तावावर मी रेडिरेकनर दरानुसार देण्याचा मुद्दा मांडला होता. यामुळे नाराज झालेल्या फकी, वस्तानवी यांनी एकत्र येऊन आपल्यावर अविश्वास ठराव दाखल केला.

बोर्डाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण अध्यक्ष म्हणून बरीच कामे केली. ६० कर्मचाऱ्यांची भरती करावी असा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात आला.

या प्रस्तावाला अद्याप मंजुरी मिळालेली नाही. भविष्यात मंजुरी मिळाल्यावर बोर्डाच्या कामकाजात अधिक सुधारणा होईल. १३ एप्रिल २०१६ रोजी सेना-भाजप युती सरकारने वक्फ बोर्डाच्या जमिनींवरुन मुतवल्लींची नावे काढून बोर्डाचे नाव लावण्याचे आदेश जारी केले.

या निर्णयामुळे बोर्डाला मोठा फायदा होणार असल्याचे त्यांनी नमूद केले. मी उद्या बोर्डाचा अध्यक्ष नसलो तरी सदस्य म्हणून राहणारच आहे. चुकीचा एखादा प्रस्ताव आल्यास त्याला मी कडाडून विरोध दर्शविणारच आहे.

## जागो ग्राहक जागो : जीएसटी कमी होऊनही जुन्याच दराने विक्री चालू

# ग्राहकांचे दुर्लक्ष; विक्रेत्यांची चंगळ

ऋचिका पालोदकर । लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** वस्तू व सेवाकर (जीएसटी) परिषदेच्या मागच्या आठवड्यात झालेल्या २३ व्या बैठकीत जीएसटी कपातीचा निर्णय घेण्यात आला. यादरम्यान तब्बल १७८ वस्तूंवरील जीएसटी २८ टक्क्यांवरुन १८ टक्के करण्यात आला. दि. १५ नोव्हेंबरपासून सुधारित जीएसटीनुसार नव्या किमतीत वस्तू मिळतील, असे आदेश असतानाही जुन्याच एमआरपीनुसार दुकानदारांनी वस्तू विकल्या आणि ग्राहकांनीही डोळे झाकून बिनबोभाट त्या वस्तू खरेदी करुन स्वत:ची फसवणूक करुन घेतली. बुधवारी 'लोकमत'ने केलेल्या विशेष अभ्यासात ही गंभीर बाब निदर्शनास आली.

जीएसटी कपातीनुसार दैनंदिन वापरातल्या अनेक वस्तूंचे दर कमी झाले आहेत. यावर ग्राहकांनी फक्त समाधान व्यक्त करण्यापलीकडे काहीही केले नसून अजिबात जागरुकता न दाखविल्यामुळे दुकानदारांचे चांगलेच फावले असल्याचे दिसून आले.

च्युईंगम, चॉकलेट, कॉफी, कस्टर्ड पावडर, दंत आरोग्य उत्पादने, पॉलिश, क्रीम, सॅनिटरी वेअर, कृत्रिम फर, केसांचे टोप, कुकर, स्टोव्ह, आफ्टर शेव्ह, डियोड्रंट, डिटर्जंट, वॉशिंग पावडर, रेझर, ब्लेड, कटलरी, स्टोअरेज वॉटर हिटर, बॅटरी, गॉगल, प्लायवूड, मनगटी घड्याळ या वस्तू २८ टक्क्यांवरुन १८ टक्क्यांवर आल्या आहेत. याशिवाय सहा वस्तूंवरील कर १८ टक्क्यांवरुन ५ टक्के केला आहे. आठ वस्तूंवरील कर १२ टक्क्यांवरुन ५ टक्क्यांवर, तर सहा वस्तूंवरील कर ५ टक्क्यांवरुन ० टक्क्यांवर आला आहे. नव्या नियमानुसार दि.१४ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपासून ग्राहकांना नव्या दरात वस्तू मिळणे क्रमप्राप्त आहे.

यासंदर्भात शहरातील काही दुकानांमधे आणि मॉलमध्ये जाऊन पाहणी करण्यात आली. वरील कोणत्याही वस्तूंवर नवीन दराचे टॅग लावण्यात आलेले नव्हते. तज्ज्ञ मंडळींच्या मते दुकानदारांनी नवीन दराचे टॅग लावणे अनिवार्य आहे; मात्र टॅग लावले गेले नसतील तर किमान वस्तू घेतल्यावर येणाऱ्या बिलामध्ये नव्या दरानुसार ग्राहकांकडून पैसे घ्यावेत.

उदाहरणार्थ जर दि. १४ रोजी २८ टक्के जीएसटी असताना एखादी वस्तू १०० रुपयाला मिळत असेल तर दि. १५ पासून त्या वस्तूवर १८ टक्के कर लागतो. म्हणजेच जीएसटी थेट १० टक्क्यांनी कमी होऊन त्या वस्तूची किंमत ९० रुपये होते. इथे ग्राहकाच्या खिशातून सरळसरळ जास्तीचे दहा रुपये जात आहेत.

### ग्राहकांना फायदा होणे आवश्यक




वस्तूंवरच्या छापील किमती (एमआरपी) रातोरात बदलणे शक्य नसले तरी जीएसटीमध्ये कमी झालेल्या दराचा फायदा हा शेवटच्या ग्राहकांपर्यंत पोहोचला पाहिजे. तसे न झाल्यास ग्राहकांचे नुकसान होईल आणि दुकानदारांना वाढीव नफा. सरकारने मूल्यवर्धित करप्रणालीवरुन वस्तू व सेवाकरात येताना नफेखोरीविरोधी कायदा करुन बदलत्या करप्रणालीत घटलेल्या करदराचा फायदा हा शेवटच्या ग्राहकांना पोहोचावा अशी तरतूद केली आहे; पण अशी कायदेशीर तरतूद जीएसटीमध्ये घटलेल्या दराबाबत सरकार आणते का, ते बघणे औत्सुक्याचे ठरेल.

- सीए रोहन अचलिया

### ग्राहकच दोषी

दि. १५ नोव्हेंबरपासूनच ग्राहकांना नवीन दरात वस्तू मिळणे आवश्यक आहे. तसे होत नसेल तर ती ग्राहकांची फसवणूक आहे; पण याला दुकानदारांपेक्षाही ग्राहक स्वत:च जबाबदार आहेत, कारण सामान्य ग्राहक कधीच कोणत्या गोष्टीसाठी बिलाची मागणी करीत नाही. भविष्यात जर जीएसटी फेल गेले तर त्याला आपणच ग्राहक सर्वस्वी दोषी असू.

- सीए उमेश शर्मा



# जिल्ह्यातील ४६५ शेतकरी कुटुंबांच्या दारी अधिकारी

## भेटी : विभागीय आयुक्तांसह इतर अधिकाऱ्यांकडून पाहणी

लोकमत न्यूज नेटवर्क



जटवाडा येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला भेट दिल्यानंतर धनादेश सुपूर्द करताना विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर.

**औरंगाबाद :** मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची पाहणी करण्यासाठी बुधवारी सुरुवात झाली. विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांच्यासह ४६५ अधिकारी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या दारी गेले. ३५० कुटुंबांच्या भेटी अधिकाऱ्यांनी घेतल्या. काही ठिकाणी शेतकरी उपलब्ध होऊ शकले नाहीत. घरांना कुलूप असल्यामुळे त्यांची भेट झाली नाही.

१५ नोव्हेंबरपासून मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत गेल्या पाच वर्षांत आत्महत्या केलेल्या प्रत्येक शेतकऱ्याच्या कुटुंबाला एक अधिकारी, कर्मचारी भेट देण्याचा उपक्रम राबविण्यास सुरुवात झाली. कुटुंबासोबत चर्चा करुन सध्याच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीचा आढावा अधिकाऱ्यांनी घेतला. कुटुंबांना सरकारी योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. १ जानेवारी २०१२ ते ३० ऑक्टोबर २०१७ या कालावधीतील शेतकरी आत्महत्या प्रकरणांच्या पाहणीमध्ये समावेश करण्यात आला आहे. ७ डिसेंबरपर्यंत पाहणीचा तपशील जिल्हा प्रशासन तयार करील. ८ ते २२ डिसेंबर या कालावधीत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना विविध योजनांचा लाभ देऊन त्याचा अहवाल २६ डिसेंबर रोजी विभागीय आयुक्त कार्यालयाला सादर करावा लागणार आहे.

**कुटुंबियांना सर्वतोपरी मदत करणार**

शासन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांच्या पाठीशी उभे असून, त्या कुटुंबांना शासनाकडून सर्वतोपरी मदत करण्यात येणार असल्याचे विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांनी सांगितले. जटवाडा येथील शेख शानुर शेख डोंगर या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबियांना विभागीय आयुक्तांनी भेट दिली.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाची परिस्थिती काय आहे, त्यांना शासनाच्या कोणकोणत्या योजनांचा लाभ देता येईल यासंबंधीची माहिती जाणून घेण्यासाठी १५ नोव्हेंबरला मराठवाड्यातील महसूल अधिकारी शेतकऱ्यांच्या घरी जाऊन त्यांच्याकडून विशिष्ट फॉर्मच्या माध्यमातून माहिती भरुन घेणार आहेत.

हा उपक्रम विभागीय आयुक्तांच्या पुढाकारातून तयार झाला आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून स्वत: विभागीय आयुक्त या कुटुंबाला भेट देण्यासाठी गेले होते. त्या कुटुंबियांचे सांत्वन करताना डॉ. भापकर म्हणाले की, संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून कुटुंबांना मदत करण्यात येईल. कुटुंबाचे पालकत्व तहसीलदार स्वीकारणार असून, या कुटुंबियांची वारंवार भेट घेऊन त्यांच्या अडीअडचणी सोडवणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी तहसीलदार सतीश सोनी, शिनगारे तसेच सरपंच, ग्रामसेवक, गावकरी उपस्थित होते.






दिग्दर्शक मुरली नलप्पा आणि तेजस्विनी पंडितला सोनी मसाले देताना महेश सोनी आणि अनिता सोनी. दुसऱ्या छायाचित्रात सखींसोबत सेल्फी काढताना अभिनेत्री तेजस्विनी पंडित.

# सखींसोबत तेजस्विनीच्या दिलखुलास गप्पाटप्पा

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : कसदार** अभिनयाच्या जोरावर मराठी प्रेक्षकांच्या घरघरांत प्रवेश केलेल्या अभिनेत्री तेजस्विनी पंडितने बुधवारी सायंकाळी लोकमत सखीमंचच्या व्यासपीठावर 'एन्ट्री' केली आणि आपल्या मोहक हास्याने आणि दिलखुलास गप्पांनी सखींना आपलेसे करुन टाकले.

लोकमत सखीमंचतर्फे आयोजित 'गप्पा-टप्पा' या कार्यक्रमाच्या माध्यमातून तेजस्विनी सखींच्या भेटीला आली होती. लोकमत लॉन येथे झालेल्या या कार्यक्रमाचे सोनी मसाले सहप्रायोजक होते. सोनी मसालेच्या अनिता सोनी, महेश सोनी यांनी तेजस्विनीचे स्वागत केले. यावेळी तेजस्विनीच्या आगामी 'देवा' या चित्रपटाचे दिग्दर्शक मुरली नालप्पा यांचीही उपस्थिती होती.

तेजस्विनी पंडित, अंकुश चौधरी, वैभव मांगले, डॉ. मोहन आगाशे अशी तगडी स्टारकास्ट असणारा 'देवा... एक अंतरंगी' हा चित्रपट दि. १ डिसेंबर रोजी प्रदर्शित होत आहे. सखींच्या वतीने सारंग टाकळकर यांनी तेजस्विनीला प्रश्न विचारुन चित्रपटाविषयी जाणून घेतले. 'देवा'मध्ये तेजस्विनी माया या लेखिकेचे पात्र साकारत असून, कथा शोधण्यासाठी बाहेर पडलेल्या मायाला प्रवासादरम्यान देवा (अंकुश चौधरी) हा अंतरंगी व्यक्ती भेटतो आणि कथा फुलत जाते.

कोकणाचे विलोभनीय दर्शन घडविणाऱ्या या चित्रपटात संगीतकार अमितराज यांचे श्रवणीय संगीत ऐकण्याची संधीही रसिकांना मिळेल.

अनेकदा नकारात्मक भूमिकांमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणाऱ्या तेजस्विनीला नकारात्मक भूमिका साकारायला आवडते. ती या भूमिका 'एन्जॉय' करते. तिच्या मते, नकारात्मक पात्र हे अधिक सक्षम, कणखर असतात.

अभिनय क्षेत्रात असल्यामुळे 'मेटेंन्ड' राहावे लागत असले तरीही आपण पक्के खादाड असून, मासे हा आपला वीक पॉइंट आहे. औरंगाबादचा स्पेशल भल्लाही आपण मागविला आहे, असे तिने सांगितले.

### '१०० डेज'ने सांगता

◆ तेजस्विनी अभिनयाप्रमाणेच गाणेही सुरेख गाते, हे सखींना माहितीच होते. त्यामुळे गप्पा-टप्पांची सांगता तेजस्विनीच्या एका गाण्यानेच व्हावी, अशी सखींनी फर्माईश केली. सखींच्या आग्रहाचा मान ठेवून तेजस्विनीने तिच्या गाजलेल्या '१०० डेज' या मालिकेचे शीर्षक गीत गाऊन सखींना खुश केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला औरंगाबादकराओके क्लब रतन नगरकर, सुधीर चार्लीकर, मंजूश्री दवणे या गायकांनी बहारदार हिंदी, मराठी, नवी-जुनी गाणी सादर करुन उपस्थित सखींची मने जिंकली. गुलाबी थंडीत गाणी ऐकण्याचा अनुभव सखींसाठी अत्यंत आनंददायी ठरला.

# घाटीत शनिवारी देहदान ऋणनिर्देश सोहळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : शासकीय** वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील (घाटी) शरीररचनाशास्त्र विभागातर्फे १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता महात्मा गांधी सभागृहात 'देहदान ऋणनिर्देश सोहळा' आयोजित करण्यात आला आहे. मागील ३ वर्षांत सामाजिक, शैक्षणिक आणि संशोधन कार्यासाठी केलेल्या देहदानाबद्दल कुटुंबियांचे आभार व्यक्त करणारा हा सोहळा असल्याचे विभागप्रमुख डॉ. शिवाजी सुक्रे यांनी दिली.

गेल्या ३ वर्षांत प्रियजनांच्या मृत्यूनंतर अनेक कुटुंबियांनी देहदान करुन वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनात महत्त्वपूर्ण योगदान दिले. या सर्वांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या सोहळ्याचे आयोजन केले आहे. या सोहळ्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती पी. आर. बोरा, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सहसंचालक डॉ. सुरेश बारपांडे आणि अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर यांची उपस्थिती राहील.

डॉ. सुक्रे म्हणाले की, वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना देहदानाचा मोठा फायदा होतो. मानवी आरोग्याशी निगडित विविध आजारांवरील संशोधनासाठी या दानाचा मोलाचा वाटा आहे. या सोहळ्यात ६७ हून अधिक दात्यांच्या नातेवाईकांचा सत्कार करण्यात येणार आहे. यातून त्यांचे आभार व्यक्त होतील आणि समाजाला प्रेरणा मिळून देहदानाला प्रोत्साहन मिळावे, अशी अपेक्षा आहे. या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. सुक्रे यांनी केले आहे.

Govt Reg.No.7342
पेन केअर इंस्टीट्युट
ऑर्थोपेडीक सर्जन द्वारे सल्ला व उपचार



सांधेवात, गुडघेदुखी, मान, पाठ, कंबरदुखी मायग्रेन (डोकेदुखी), फ्रोझन शोल्डर (खांदेदुखी) सायटीका, स्लिप डिस्क, टाचदुखी, टेनिस ऐल्बो हातापायात मुंग्या येणे
अपना बाजार, बाफना ज्वेलर्स समोर, जालना रोड, औरंगाबाद.
9822899660, 9422713387, 9767442040
(कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे)
सोमवार ते शुक्रवार फक्त

वाहन चालवीत असताना मोबाइलचा वापर करू नका.

आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापूर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैगिंक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. ॲझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.



आशाकिरण क्लिनीक
१९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521